**कृषि विज्ञान केंद्र, पोखर्णी चे आदिवासी उपयोजने अंतर्गत महिला बचत गटाला निविष्ठा वाटप व हळद पिकाबद्दल थेट बांधावर मार्गदर्शन.**

कृषि विज्ञान केंद्र, पोखर्णी, नांदेड-१ च्या वतीने दहेगाव (ता. माहूर) येथे आदिवासी उपयोजने अंतर्गत महिला बचत गटाला आणि हळद उत्पादक शेतकऱ्यांना मार्गदर्शन व निविष्ठा वाटप करण्यात आले.

**प्रमुख वैशिष्ट्ये:**

✅ हळद पिकाचे योग्य खत व्यवस्थापन आणि जैविक बुरशीनाशक (ट्रायकोडर्मा व मेटारायझियम) वापरण्याबाबत सखोल मार्गदर्शन.

🐦 महिला सबलीकरणासाठी 'सोनाली' जातीचे १५ दिवसीय कुक्कुटपक्षी आणि ३ स्टार्टर खाद्य बॅगचे वाटप.

▯ सेंद्रिय शेतीला चालना देण्यासाठी गांडूळखत निर्मिती बॅग्ज, तसेच आंबा व शेवग्यांच्या रोपांचे वाटप.

**मार्गदर्शक :**

कृषि विज्ञान केंद्र, पोखर्णी, नांदेड -1

➡डॉ. देविकांत देशमुख (वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख)

➡प्रा. माणिक कल्याणकर (पीक संरक्षण तज्ञ )

➡ डॉ. महेश आंबोरे (पशुवैद्यक तज्ञ )

याप्रसंगी ता.कृ.अधिकारी श्री. यलपलवाड, व स. कृ. अ. श्री साबळे तसेच 'आत्मा'चे श्री. महेश तहाडेव व साकुर - दहेगाव ग्रामपंचायातचे सरपंच श्री तांबारे यांच्यासह परिसरातील शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

